

https://fb.watch/bCH1Z50Tu_/

# विविध क्षेत्रातील महिलांची झेप ! तरुणींसोबत साधलेला संवाद...जाणून घ्या

#MaharashtraNews #Lokmat #WomensDay





राष्ट्रीय सेवा योजना,
यांच्या



महाराष्ट्र शासन
जिल्हास्तरीय पुरस्कार
प्रमाणपत्र
GOVERNMENT OF MAHARASHTRA
NATIONAL SERVICE SCHEME
DISTRICT LEVEL AWARD
CERTIFICATE


Supriya Haryan
Shailaja Jogal / Lokmat
Pradnya Kate
Kajal Durge



महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
राष्ट्रीय सेवा योजना
जिल्हास्तरीय पुरस्कार
प्रमाणपत्र

सत्यमेव जयते

राष्ट्रीय सेवा योजना
NATIONAL SERVICE SCHEME

GOVERNMENT OF MAHARASHTRA
HIGHER & TECHNICAL EDUCATION DEPARTMENT
NATIONAL SERVICE SCHEME
DISTRICT LEVEL AWARD
CERTIFICATE

सुप्रिया प्रकाश हरियण

यांना राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत कोविड-१९ महामारी आपत्तीमध्ये उल्लेखनीय कार्य करून विद्यार्थी स्वयंसेवकांना प्रोत्साहित करणारी यशोगाथा निर्माण केल्याबद्दल वर्ष २०२०-२१ चा 'रासेयो कोविड योद्धा जिल्हास्तरीय पुरस्कार' प्रदान करण्यात येत आहे.

डॉ. प्रभाकर देसाई
राज्य संपर्क अधिकारी/विशेष कार्य अधिकारी
राष्ट्रीय सेवा योजना, उच्च व तंत्र शिक्षण विभाग
महाराष्ट्र शासन

Supriya Prakash Haryan

is being awarded the 'NSS Covid Warrior- District Level Award' under the National Service Scheme for the year 2020-21 for creating a success story by doing remarkable work encouraged student volunteers during the Covid-19 pandemic disaster.

श्री. उदय सामंत
मंत्री
उच्च व तंत्र शिक्षण
महाराष्ट्र शासन



# उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन

राष्ट्रीय सेवा योजना
"आजादी का अमृत महोत्सव" अंतर्गत
राज्यस्तरीय रा. से. यो. पुरस्कार वितरण
सोहळा - २०१६-१७ ते २०२०-२१
"कोविड युवा यौध्दा" पुस्तक प्रकाशन
व
सांगीतिक कार्यक्रम

सत्यमेव जयते

राष्ट्रीय सेवा योजना
NATIONAL SERVICE SCHEME

शुभहस्ते

**मा. ना. उदय सामंत**
मंत्री, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य.

प्रमुख उपस्थिती

**मा. ना. प्राजक्त तनपुरे**
राज्यमंत्री, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य.

सह उपस्थिती

**डॉ. विकासचंद्र रस्तोगी**
प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य.

**मा. डॉ. उज्ज्वला चक्रदेव**
कुलगुरु, एस, एन, डी.टी. महिला विद्यापीठ, मुंबई

**मा. डॉ. ए. एम. पातुरकर**
विज्ञान कुलगुरु, महाराष्ट्र पशु व मत्स्य विद्यापीठ, नागपूर

**मा. अंकीत प्रभू**
सदस्य, राज्य सल्लागार समिती रा. से. यो. महाराष्ट्र राज्य

**श्री. दत्ता बाळ सराफ**
सदस्य, राज्य सल्लागार समिती रा. से. यो. महाराष्ट्र राज्य

**श्री. संजय सिसोदे**
सदस्य, राज्य सल्लागार समिती रा. से. यो. महाराष्ट्र राज्य

**मा. डी. कार्तिकेयन**
क्षेत्रीय संचालक रा.से.यो. महाराष्ट्र राज्य

**श्रीम. स्वाती मोहपात्रा**
संवाद व समर्थन विशेषज्ञ युनिसेफ महाराष्ट्र कार्यालय, मुंबई.


**श्री. अमित गुप्ता, पवई, मुंबई**
सदस्य, राज्य सल्लागार समिती रा. से. यो. महाराष्ट्र राज्य

निमंत्रक
**डॉ. प्रशांत कुमार वनंजे**
राज्य संपर्क अधिकारी व विशेष कार्य अधिकारी, रा.से.यो., महाराष्ट्र राज्य

सदर पुरस्कार वितरण कार्यक्रमास उपस्थित राहण्यास आपणास निमंत्रित करीत आहोत.

दि. २५ एप्रिल २०२२, वेळ - दु. १.३० वा.
स्थळ :- पाटकर सभागृह, श्रीमती ना.दा. ठाकरसी विद्यापीठ, चर्चगेट, मुंबई-२०


राष्ट्रीय सेवा योजना, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन व
मुंबई विद्यापीठ
यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित
सेवा योजना स्वयंसेवक
समारंभ


कोविड
युवा
योद्धा!
Higher and Technical
Education Maharashtra
unicef
for every child

# श्रेयनामावली

**मार्गदर्शक**

मा. उदय सामंत

मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन

मा. प्राजक्त तनपुरे

राज्य मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन

मा. विकासचंद्र रस्तोगी

प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन

मा. प्रताप लुबाळ

उप सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन

मा. डी. कार्तिकेयन

विभागीय संचालक, राष्ट्रीय सेवा योजना, महाराष्ट्र व गोवा

मा. डॉ. प्रभाकर देसाई

राज्य संपर्क अधिकारी, राष्ट्रीय सेवा योजना, महाराष्ट्र शासन

मा. डॉ. प्रशांतकुमार वनंजे

राज्य संपर्क अधिकारी, राष्ट्रीय सेवा योजना, महाराष्ट्र शासन

मा. स्वाती मोहपात्रा

संवाद व समर्थन विशेषज्ञ, युनिसेफ, महाराष्ट्र

**लेखन व संपादन**

तानाजी पाटील राज्य सल्लागार (संवाद व समर्थन ), युनिसेफ महाराष्ट्र

श्रुति गणपत्ये राज्य सल्लागार (संवाद व समर्थन), युनिसेफ महाराष्ट्र

अलका गाडगीळ, समन्वयक चरखा

वर्षा देशपांडे, संपर्क

आशय गुणे, संपर्क

संयोगिता ढमढेरे, डीएलए फाऊंडेशन

दिपाली चौधरी

**विशेष सहाय्य**

मा. मंगेश खैरनार

सहाय्यक लेखा अधिकारी, राष्ट्रीय सेवा योजना, महाराष्ट्र शासन

**डिझाईन**

तेजस्विनी तिवले चरखा

**छपाई**

नितिन कडू


**प्रकाशन व वितरण**

राज्य संपर्क अधिकारी

राष्ट्रीय सेवा योजना, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन

(अंतर्गत वितरणासाठी)

...ट कोविड युवा योध्या हे पुस्तक युनिसेफ द्वारा प्राप्त अर्थसहाय्यातून डिझाईन व छपाई करण्यात आलेली आहे.)




## उप मुख्यमंत्री
### महाराष्ट्र राज्य

दि. १० नोव्हेंबर २०२१

**संदेश**

राज्यातील विविध विद्यापीठांतर्गत राष्ट्रीय सेवा योजनेतील स्वयंसेवकांनी कोरोना संकटकाळात केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन त्यांच्या यशोगाथांचे प्रकाशन युनिसेफच्या माध्यमातून करण्यात येत असल्याचे समजून आनंद झाला. या यशोगाथा प्रकाशन उपक्रमास मनःपूर्वक शुभेच्छा.

कोरोना संकटकाळात प्रतिबंधात्मक नियमावली आणि लोककल्याणाच्या नियोजनाची प्रशासनाकडून अंमलबजावणी झाली. कोविड-१९ महामारीने सर्वांचे जीवन बदलून गेले आहे. आरोग्य व साधनसुचितेची नवी परिमाणे तयार झाली आहेत. राष्ट्रीय सेवा योजनेलाही या संक्रमणकाळात काही बदल करावे लागले. शाळा-महाविद्यालये व विद्यापीठ स्तरावर राष्ट्रीय सेवा योजनेने केलेले व्हर्च्युअल नियोजन हे त्याचे उदाहरण आहे.

राष्ट्रीय सेवा योजनेच्या सर्वच घटकांनी एकत्र न होता, आहे तिथेच राहून कुटुंब, गावे आणि पंचक्रोशीतील बांधवांच्या दैनंदिन गरजांची काळजी घेणे तसेच सेवासुश्रुषा करण्याची कामगिरी केली आहे. राष्ट्रीय सेवा योजनेतील स्वयंसेवकांचे कार्य उल्लेखनीय आहे. त्यांच्या कार्याची नोंद या यशोगाथेत प्रातिनिधिक रूपाने होत आहे. या यशोगाथा सर्वांसाठी प्रेरणादायी ठरतील, असा विश्वास आहे. यशोगाथा प्रकाशन उपक्रमास मनःपूर्वक शुभेच्छा.

(अजित पवार)

**उदय सामंत**

मंत्री
उच्च व तंत्र शिक्षण
महाराष्ट्र राज्य

## शुभेच्छा संदेश

महाराष्ट्राच्या राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांनी कोविड-१९ महामारी काळात केलेल्या अविरत व अथक समाजसेवेचे कार्य मी प्रत्यक्ष अनुभवले आहे. उच्च व तंत्र शिक्षण विभागाचा मंत्री म्हणून माझा राष्ट्रीय सेवा योजनेशी रोज संपर्क येतो. ह्या योजनेतील सर्वच घटक अत्यंत प्रामाणिकपणे आपले योगदान देतात. कोविड-१९ काळातील प्रतिबंधात्मक उपाययोजनांमुळे सर्वसामान्य जनतेचे जे हाल झाले आणि आकस्मित घटनांमुळे दुःखाचे डोंगर कोसळले. अशा विदारक परिस्थितीत महाराष्ट्राच्या राष्ट्रीय सेवा योजनेचा स्वयंसेवक धीरोदात्तपणे उभा राहिला आणि प्रशासनाच्या खांद्याला खांदा लावून ज्या आत्मियतेने त्यांनी मदत केली, ती अवर्णनीय आहे.

नातेवाईकांनी कोविडग्रस्त प्रेत प्रतिबंधामुळे उचलले नाही. तेव्हा त्यावर रीतसर संस्कार करणारा माझा राष्ट्रीय सेवा योजनेचा विद्यार्थी होता. कोविडच्या रुग्णांना आणि मृत व्यक्तींना रुग्णवाहिकेतून नेणारी विद्यार्थीनी राष्ट्रीय सेवा योजनेची होती. मोलमजुरी करणारे परप्रांतीय मजूर आपापल्या गावी पायपीट करत होते. त्यासाठी रस्त्यावर छावण्या बांधून त्यांना अन्न-पाण्याची व्यवस्था करणारे माझे तरूण राष्ट्रीय सेवा योजनेचे होते. या कोविड महामारीने नाना कळा दाखवल्या आणि त्या प्रत्येक वेळी सर्वसामान्यांच्या मदतीला धावून येणारी उर्जा ही राष्ट्रीय सेवा योजनेची होती, याचा मला सार्थ अभिमान आहे. ही यशोगाथा प्रातिनिधीक आहे, पण महाराष्ट्राच्या तरूणाईचे सामाजिक भान प्रकटणारी आहे. रासेयोच्या सर्व घटकांचे मनःपूर्वक अभिनंदन.

(उदय सामंत)

---

**उद्धव बाळासाहेब ठाकरे**
मुख्य मंत्री
महाराष्ट्र

मंत्रालय
मुंबई ४०० ०३२
.14 MAR 2C2?

## शुभेच्छा

महाराष्ट्र संतांची, शिवरायांच्या पराक्रमाची भूमी आहे. ही भूमी समाजसेवकांची, क्रांतीकारकांची आणि विचारवंतांचीदेखील आहे. महाराष्ट्रात नाविन्याची मुहूर्तमेढ रोवली जाते आणि अन्य राज्ये त्याचे अनुकरण करतात. रणांगणावरील असो अथवा महामारीसारख्या अदृश्य शत्रूबरोबरचे युद्ध ही शौर्यभूमी सदैव तत्पर असते.

राज्यातील आपले तरुण विद्यार्थी मित्र जितके पराक्रमी तितकेच सर्जनशील आहेत. महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांमधील ऊर्जेला विधायक मार्ग दाखविण्याचे महत्वाचे कार्य राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून होत आहे. याद्वारे तळागाळासाठी निष्काम भावनेने कार्य करण्याचा अनुभव तरुणाईला मिळतो. यातून पुढे येणारे युवक नव्या सामाजिक-सांस्कृतिक व राजकीय महाराष्ट्राला पुढे नेणारे शिलेदार होतील, अशी अपेक्षा आहे.

कोविडमुळे जगभरात हाहाकार उडाला, या काळात महाराष्ट्र डगमगला नाही. या महामारीचा आपण निर्भीडपणे सामना केला. राज्याच्या प्रशासनाने रात्रंदिवस प्रतिबंधात्मक आणि उपाययोजनात्मक काम केले. या सर्व काळात राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी केलेले सहकार्य निश्चितच कौतुकास्पद होते.

राष्ट्रीय सेवा योजनेने "माझे कुटुंब माझी जबाबदारी" व "माझा गाव कोरोनामुक्त गाव" या संकल्पनेस कृतिप्रवण प्रतिसाद दिला, ही निश्चितच समाधानाची बाब आहे. स्वयंसेवकांनी केलेल्या आपातकालीन कार्यांचे, महामारीतील संवेदनशीलतेचे आणि त्यांच्या धैर्याचे कौतुक करावे तितके थोडे आहे. कोविड काळातील स्वंयसेवकांच्या यशोगाथांचे प्रकाशन होत आहे, ही आनंदाची बाब आहे. या उपक्रमास मनःपूर्वक शुभेच्छा !

आपला नम्र,

**(उद्धव बाळासाहेब ठाकरे)**

मुख्य सचिव कार्यालय
हुतात्मा राजगुरू चौक,
मादाम कामा मार्ग,
मंत्रालय०३२ ४०० मुंबई ..
दिनांक -: १० नोव्हेंबर,२०२१.

सीताराम कुंटे
मुख्य सचिव

## शुभेच्छा संदेश

कोविड जागतिक महामारीची लाट भारतात आली आणि महाराष्ट्र राज्यात या महामारीचे पडसाद तात्काळ उमटले. महाराष्ट्राच्या प्रशासनाने मा. मुख्यमंत्री, मा. उपमुख्यमंत्री व महाराष्ट्र शासनाच्या धोरणात्मक निर्णयांची व प्रतिबंधात्मक उपायांची अंमलबजावणी सुरू केली. महाराष्ट्र शासनाने समाजातील सर्वच घटकांना कोविड विषयक उपाययोजना व खबरदारीचे आवाहन केले. राज्याचा प्रशासकीय प्रमुख या नात्याने शासनाच्या विविध विभागांबरोबर काम करताना मिळालेले उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे सहकार्यही अत्यंत महत्त्वाचे आहे. उच्च व तंत्र शिक्षण विभागात काम करतानाच्या माझ्या पूर्वानुभवात राष्ट्रीय सेवा योजनेची सर्वव्यापी संरचना आणि तळागाळात जाऊन काम करण्याची पद्धती मला परिचित आहे. या कोविड महामारीतही याचा प्रत्यय आला. प्रशासनाचे धोरण आखणे, अंमलबजावणी करणे आणि सर्वसामान्य जनतेचा लोकव्यवहार सुरळीत करणे, या सर्वात प्रशासकीय अधिकारी व कर्मचारी होतेच, परंतु या नियोजनात राष्ट्रीय सेवा योजनेचा विद्यार्थीही अधिक जोखमीने तळागाळात कार्य करत होता, हेही नमूद करायला हवे. राज्यातील युवकांचे प्रतिनिधित्व करणारी रासेयो ही कार्यप्रवण रचना आहे. त्यांनी कोविड काळात बजावलेल्या अद्वितीय कामगिरीचे ही "यशोगाथा" म्हणजे प्रातिनिधीक उदाहरण आहे. ह्या यशोगाथेचे अधिकाधिक अनुकरण घडो, हीच सदिच्छा. रासेयोच्या सर्व घटकांचे व विशेषत: रासेयो स्वयंसेवकांचे मन:पूर्वक अभिनंदन.

( सीताराम कुंटे )

## महाराष्ट्र शासन

उच्च व तंत्रशिक्षण विभाग,
४०९, मंत्रालय, विस्तार भवन,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मुंबई -४०० ०३२.
दूरध्वनी क्र.०२२- २२०२५३०१
Email psec.higheredu@maharashtra.gov.in

विकास चंद्र रस्तोगी, भा.प्र.से.
प्रधान सचिव

### शुभेच्छा संदेश

कोविड-१९ महामारी काळातील महाराष्ट्राच्या राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांनी विविध आघाड्यांवर केलेल्या कार्याचा वानगीदाखल नमुना म्हणून ही युवक कोविड योद्धा यशोगाथा प्रकाशित होत आहे. उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अंतर्गत राष्ट्रीय सेवा योजनेचे अस्तित्व आणि महत्त्व वादातीत आहे. राष्ट्रीय सेवा योजना ही युवकांमध्ये सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक व राजकीय मूल्ये संस्कारित करणारी सुपीक जमीन आहे. राष्ट्रीय सेवा योजनेचा स्वयंसेवक ही विधायक शक्ती आहे. देशाच्या समृद्धीचे वाहक म्हणून युवकांची कामगिरी खूपच महत्त्वाची असते. देश संकटात असेल तर हवालदिल होऊन तितक्याच धीरोदात्तपणे मदतीला येणारा पहिला युवकच असतो. राष्ट्रीय सेवा योजनेत या युवकांची मूल्यात्मक व कार्यानुभवाच्या पातळीवर सशक्त पायाभरणी केली जाते. म्हणूनच या योजनेचे "Not me but you" हे ब्रीद खूपच मौलिक आहे.

कोविड-१९ महामारी काळात मा. मंत्री महोदय (उच्च व तंत्र शिक्षण) आणि मा. राज्यमंत्री महोदय (उच्च व तंत्र शिक्षण) यांच्या नेतृत्वाखाली उच्च व तंत्र शिक्षण विभागाने शैक्षणिक क्षेत्रात केलेली कामगिरी निश्चितच उल्लेखनीय आहे. उच्च शिक्षणाचे क्षेत्र अविरत क्रियाशील ठेवण्यात महाराष्ट्र शासनाचा जितका वाटा आहे, तितकाच राज्यातील शैक्षणिक संस्था व त्याअंतर्गत सर्व घटकांचा आहे. कोविड काळात संक्रमित लोकसमूहांना मदत करण्यास हे सर्व घटक पुढे आले. डॉक्टर्स, परिचारक, पोलिस या सर्व घटकांनी रात्रंदिवस कार्य केलेच. परंतु रासेयो स्वयंसेवकांनी केलेले कार्य नैतिकदृष्ट्या व मूल्यात्मदृष्ट्या विशेष महत्त्वाचे आहे. या अनुषंगाने प्रातिनिधिक कार्याची ही यशोगाथा प्रकाशित होत आहे. महाराष्ट्र राज्य राष्ट्रीय सेवा योजनेचे मन:पूर्वक अभिनंदन.

ठिकाण - मंत्रालय, मुंबई
दिनांक - १०.११.२०२१

(विकासचंद्र रस्तोगी)

राज्यमंत्री
नगरविकास, ऊर्जा, आदिवासी विकास
उच्च व तंत्र शिक्षण, आपत्ती व्यवस्थापन
मदत व पुनर्वसन
महाराष्ट्र राज्य
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
www.maharashtra.gov.in

दिनांक : 10 NOV 2021

## शुभेच्छा संदेश

कोविड महामारीच्या काळात ज्या व्यक्ती आणि समूहांनी आपले सामाजिक योगदान दिले, त्यात महाराष्ट्राच्या राष्ट्रीय सेवा योजनेचा वाटा सिंहाचा आहे. या योजनेतील सर्व घटकांचे नियोजन व परिश्रम ऐतिहासिक होते. लोकप्रतिनिधी म्हणून कार्य करतांना याचा सतत अनुभव आला.

नवी पिढी किती रचनात्मक व सर्जनशील असते, अगदी महामारीच्या काळातही याचा प्रत्यय आला. राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून सर्वच विद्यार्थ्यांनी आपापल्या ठिकाणी केलेली मदत नव्या सामाजिक अभिसरणाची नांदी आहे. महानगरे, शहरे आणि ग्रामीण भागातील प्रत्येक कुटुंबापर्यंत पोहोचणारी यंत्रणा म्हणून राष्ट्रीय सेवा योजना कोविड काळातही अधिक प्रकर्षाने अधोरेखित झाली आहे. त्यांनी केलेल्या कार्याची झलक या यशोगाथेत परावर्तित झाली आहे. या यशोगाथेच्या प्रकाशनानिमित्त आपले हार्दिक अभिनंदन आणि पुढील कार्यासाठी हार्दीक शुभेच्छा..!

आपला,

(प्राजक्त तनपुरे)

# अनुक्रमाणिका


1) अदिती घोडेकर .................... 2
2) आदित्य पुरूषोत्तम इंगोले .............. 4
3) अमोल उद्धवराव सरोदे ............... 6
4) अनिकेत दुर्गे .................... 8
5) आरती नाईक .................... 10
6) आरती हनुमंत वाघमारे .............. 12
7) आशिष कैलास ब्रोहटे .............. 14
8) भरत महादेव पवार ............... 16
9) गौतमी आनंद जगदेव, झुलाल .......... 18
10) गोपाळ योगेंद्र रायठ्ठा ............... 20
11) हर्षल पाटील .................... 22
12) हर्षल विनोद सावंत ............... 24
13) काजल चौधरी ................... 26
14) काजल दुर्गे .................... 28
15) कौशिक मालेवार ................ 30
16) मंगेश उमाशंकरराव चौधरी .......... 32
17) मनीषा जगजीवन मुरले ............ 34
18) प्रजा सतीश काटे ................ 36

19) प्रथमेश परांजपे ........ 38
20) प्रतीक कदम ........ 40
21) प्रतीक पावडे ........ 42
22) प्रवीण सुखदेव आटोळे ........ 44
23) प्रविण राजेंद्र कोळपे ........ 46
24) प्रिया प्रकाश पाटील ........ 48
25) सचिन रामसहाय साहू ........ 50
26) सना इरफान कुंवारी ........ 52
27) सारंग जांभुळे ........ 54
28) शिवम आशिष पटेल ........ 56
29) श्याम अंकुशराव सातपुते ........ 58
30) सिद्धेश शेळके ........ 60
31) सोनाली पांडुरंग चव्हाण ........ 62
32) सुप्रिया प्रकाश हरयन ........ 64
33) सुशील नित्यानंद धनगर ........ 66
34) तेजस सोनार ........ 68
35) त्रिवेणी हरिजी लांजे ........ 70
36) वेदांत सुदाम डिके ........ 72
37) विनोद साळवे ........ 74

**तरुण कोविड योद्ध्यांना सलाम**

भारत हा तरुणांचा देश म्हणून ओळखला जातो कारण इथली 24.2 कोटी लोकसंख्या 10 ते 24 या वयोगटामध्ये मोडते. या तरुण पिढीच्या डोळ्यासमोर अनेक स्वप्न आहेत, जग बदलण्याची महत्वाकांक्षा ते बाळगतात. कोविड 19 महामारीने जगभर उच्छाद मांडला तेव्हा हीच तरुण पिढी पुढे आली आणि हतबल झालेल्या लोकांना मदत करून या कठीण परिस्थितीचा मुकाबला केला. युनिसेफने या तरुणांना योग्य दिशा देण्याचं काम करून कोविड विरुद्धच्या लढ्यामध्ये त्यांना सहकार्य केलं. विविध तज्ज्ञांच्या मदतीने या मुलांसाठी माहिती सत्रांचं आयोजन करण्यात आलं होतं ज्यामध्ये कोविडविषयी योग्य आणि शास्त्रीय माहिती त्यांना मिळाली आणि तीच त्यांनी पुढे लोकांपर्यंत नेली. कोविड काळामध्ये लोकांमध्ये जनजागृती करणाऱ्या, कोविड योद्ध्यांना मदत करणाऱ्या राष्ट्रीय समाज सेवा (एनएसएस) महाराष्ट्र यांच्याशी संलग्न तरुण पिढीशी आम्ही जोडले गेलो याचा आम्हांला अभिमान वाटतो. साधारण तीन लाख मुलं "तरुण कोविड योद्धा" या मोहीमेशी जोडले गेली आणि त्यांनी जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न केला. टाळेबंदीमुळे या मुलांच्या कामावर काहीच परिणाम झाला नाही. उलट कोविड झालेल्या रुग्णांच्या कुटुंबियांपर्यंत पोहचून त्यांना धीर देण्याचं काम या मुलांनी केलं. या स्वयंसेवकांनी रक्तदान शिबिरं, अन्नधान्याचं वाटप, गरजूंना मास्क आणि सॅनिटाझर्सचं वाटप, तात्पुरती स्वयंपाक घरं उभारुन अन्न शिजवणं, स्थलांतरित मजुरांना मदत, कोविडमुळे नैराश्य आलेल्यांना धीर देण्याचं काम, समुपदेशनाचं कामही उत्तम पार पाडलं. कोविडविषयी माहिती देण्यासाठी मल्टीमिडिया साधनांचा वापर करून त्यांनी जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न तरुणांनी केला आणि आपल्या आजूबाजूच्या लोकांना या विषाणूशी लढण्यासाठी आत्मविश्वास दिला.

युनिसेफने सुरु केलेल्या YuWaah (युवा) या मोहीमेअंतर्गत एकट्या महाराष्ट्रातून 30 हजारांहून अधिक तरुण योद्ध्यांनी सहभाग घेतला. या तरुणांनी युनिसेफच्या यू-रिपोर्ट या प्लॅटफॉर्मच्या माध्यमातून व्हॉट्सअॅप, फेसबुक मॅसेंजर, टेलेग्राम, आयव्हीआर (Integrated voice response system) आणि कम्युनिटी रेडिओ या सहज उपलब्ध तंत्रज्ञानाचा वापर करून लस, कोविड योग्य वर्तणूक, खोट्या बातम्या ओळखणं आणि लोकांचा ताण कमी करणं असे उपक्रम राबवले. कोविडच्या लढाईत पुढे असणाऱ्या या एनएसएसच्या स्वयंसेवकांनी हॅशटॅग यंग वॉरिअर्स (#YoungWarriors) अंतर्गत अनेक साध्यासाध्या लोकांच्या विलक्षण कहाण्या पुढे आणल्या.

या धैर्यवान, हुशार तरुणांच्या कामाचं कौतुक करण्यासाठी आम्ही अशा 40 जणांच्या कथा एकत्र केल्या आहेत. त्यातील अनेक मुलं स्वतः कठीण परिस्थितून आलेली आहेत तरीही त्यांनी आपलं वैयक्तिक आयुष्य बाजूला ठेवून कोविडमध्ये देशासाठी म्हणून त्यांनी योगदान दिलं आहे. टाळेबंदी घोषित झाल्यापासूनच विषाणूला न घाबरता ही मुलं रस्त्यावर उतरुन काम करत आहेत. ही मुलं बुद्धिमान तर आहेतच त्याचबरोबर संवेदनशीलही. परिस्थितीचं गांभीर्य त्यांना चांगलं कळतं आणि म्हणूनच अथकपणे त्यांनी कोविडशी मुकाबला केला. मात्र आपला अभ्यासही सुरु ठेवला जेणेकरुन शिक्षणावर परिणाम होणार नाही.

सर्वात कठीण परिस्थितीला तोंड देताना या तरुणांमध्ये असलेली ऊर्जा, निर्भयता आणि साहस याला मी सलाम करते. या महामारीच्या काळात जितकी मेहनत त्यांनी घेतली आहे, जो अनुभव त्यांना मिळाला आहे ती त्यांच्या भविष्यासाठी एक शिदोरी आहे. मी आत्मविश्वासाने सांगू शकते की, त्यांच्या कथाही इतर हे पुस्तक वाचणाऱ्यांना प्रेरणादायी ठरतील.

**राजेश्वरी चंद्रशेखर**
**प्रमुख, युनिसेफ महाराष्ट्र**

unicef | for every child

आपण ज्या पद्धतीने लोकांसाठी धाऊन जातो तसंच लोकंही आपल्याला मदत करतात यावर माझा ठाम विश्वास आहे. अनेक कोविड रुग्णांच्या घरी मदत करताना मी त्यांना हेच सांगायचो. 'आज तुमच्यावर वेळ आली आहे, तर माझ्यासारखे काही लोकं मदत करत आहेत. पण उद्या तुम्ही या संकटातून बाहेर पडल्यावर इतर गरजूंनाही मदत करा, त्यांना हवं नको ते पाहा. त्यांना ते पटायचं आणि भविष्यात काम करण्याचं ते आश्वासन द्यायचे!'– अनिकेत म्हणाला.

त्याने राबवलेला अजून एक अनोखा उपक्रम म्हणजे कोविडविषयी अंधश्रद्धांविरोधात लोकांना जागरुक करणं. लसीकरणाची मोहीम सुरू झाल्यावर लोकांमध्ये भीतीचं वातावरण होतं. 'आशाताई'बरोबर स्वतः घरोघरी जाऊन तो लोकांना लसीकरणाची माहिती देत होता, कोविडच्या लक्षणांविषयी विचारत होता. तेव्हा एका भागामध्ये लोकं कोविड होऊ नये म्हणून एका भोंदूबाबाकडे जात असल्याचं समजलं. तिथे डोक्यावर पाणी घेऊन जायचं वगैरे उपाय सांगितले जायचे. 'अशावेळी लोकांना हे सांगणं गरजेचं होतं की, कोविडसदृश्य लक्षणं दिसली किंवा लसीकरणासाठी तर दवाखान्यात जा! अशा भोंदूबाबांकडे नाही. ते कोणालाच बरं करू शकत नाहीत पण लोकांना लुबाडण्याचं काम करतात.' मग आम्ही काही लोकांना सांगितलं की, 'तुम्ही डोक्यावरून पाणी वगैरे घेऊन त्या बाबाकडे जाता तर तेच पाणी तुम्ही आपल्या परिसरातल्या झाडांना घाला, नवीन झाडं लावा. त्यामुळे आपला परिसर सुंदर दिसेल, पर्यावरणाचं संगोपन होईल. असा काही उपक्रम दिल्याने काही लोकांचं मतपरिवर्तन निश्चितच झालं याचा मला अभिमान आहे,' तो म्हणाला.

एनएसएस'च्या माध्यमातून त्याला कोविडविषयी सातत्याने माहिती मिळत होती. लोकांमध्ये जनजागृतीसाठी पोस्टर लावणं, व्हिडिओ बनवणं हे त्याने सातत्याने केलं. आपल्या अनेक मित्र-मैत्रिणींना प्रोत्साहित केलं. त्यावेळी 'प्लाझ्मा थेरपी' कोविडसाठी उपयुक्त असल्याचं बोललं जात होतं. अनिकेतने त्याची माहिती घेऊन लोकांना 'प्लाझ्मा दान' करण्यासाठी उद्युक्त केलं. चंद्रपूर जिल्ह्याच्या नोडल अधिकारी आणि 'एनएसएस'च्या समन्वयक डॉ. विजया गेडाम यांनी त्याला सातत्याने मार्गदर्शन केले.

डॉ. प्रशांतकुमार वि. वनंजे
राज्यसंपर्क अधिकारी/विशेष कार्य अधिकारी
राष्ट्रीय सेवा योजना, महाराष्ट्र शासन

# कौटुंबिक अडचणींचा सामना करत जपलेली सामाजिक बांधिलकी




सुप्रिया प्रकाश हरयन
एसएनडीटी कॉलेज, मुंबई.


सुप्रिया हरयाण मालाडच्या कासमबाग वस्तीत राहणारी विद्यार्थिनी. तिच्या घरची परिस्थिती अगदी जेमतेमच आहे. करोना महामारीच्या काळात, मार्च २०२०मध्ये भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राष्ट्रीय टाळेबंदी जाहीर केली. या टाळेबंदीदरम्यान देशभरात करोडो मजुरांचे, कष्टकऱ्यांचे भरपूर हाल झाले. सुप्रियाचं कुटुंबही त्याला अपवाद नव्हतं. तिचे वडील इलेक्ट्रिशियन म्हणून काम करतात. कोणतीही ठाम नोकरी किंवा ठरलेला पगार नाही. हातावरचं पोट. काम मिळेल तेव्हा, मिळेल तिकडे जायचं आणि त्या-त्या दिवसाचा मजुरी आणून घर चालवायचं. टाळेबंदीमुळे सर्व प्रकारचे कारखाने बंद होते, त्यामुळे एरवी त्या कारखान्यांमधून त्यांना मिळणारं कामही बंद झालं. घरात खाणारी चार तोंडं.

या परिस्थितीत कुटुंबातली प्रत्येक व्यक्ती आर्थिक, मानसिक ताणात असणार, हे तर साहजिकच आहे, पण सुप्रियाने स्वत:मधल्या संवेदनशीलतेला योग्य दिशा देत या संकटाचंही संधीत रूपांतर केलं. ही संधीही स्वत:साठी काही करण्याची नव्हती, तर समाजासाठी मदत करण्याची होती. मुंबईतल्या एस.एन.डी.टी. कॉलेजमध्ये एस.वाय.बी.ए.ला शिकणाऱ्या सुप्रियाने कॉलेजमधल्या राष्ट्रीय सेवा योजना (एन.एस.एस.) युनिटच्या माध्यमातून करोना काळात लोकांसाठी जनजागृती करण्याचं काम हाती घेतलं.

टाळेबंदीमुळे शाळा, कॉलेजेस बंद असल्याने सुरुवातीला हे काम ऑनलाईन स्वरुपातच चाललं. करोना प्रतिबंधासाठी कोणती काळजी घ्यावी, वृद्ध, लहान मुलांनी काय खबरदारी घ्यावी, अशा अनेक मुद्यांची यथासांग माहिती देणारे प्रशिक्षण कार्यक्रम एस.एन.डी.टी कॉलेजने राबवले होते. सर्वप्रथम या ऑनलाईन प्रशिक्षण शिबिरात सहभाग घेऊन सुप्रियाने या आजाराबाबतची सगळी शास्त्रीय माहिती मिळवली. त्यानंतर एन.एस.एस.च्या स्वयंसेवकांच्या व्हॉट्सअॅप ग्रुपवर ऑनलाईन जनजागृती कशी करता येईल, याची एक योजना तयार केली. या योजनेनुसार ती आणि तिच्या मैत्रिणी दररोज, करोनाबाबत शास्त्रीय माहिती देणारे पोस्टर्स, सोशल मीडिया मेसेज असा आशय तयार करून तो प्रसारित करू लागले. सुप्रिया सांगते, "अशा प्रकारे ऑनलाईन अवेअरनेअस करताना लोकांपर्यंत अचूक आणि वैज्ञानिक माहिती पोहोचवण्याची एक जबाबदारी आणि चॅलेंजच आमच्यासमोर होतं. पण कॉलेजच्या एन.एस.एस.ने आम्हाला प्रशिक्षित करण्यासाठी ठेवलेल्या ट्रेनिंग्जचा खूप फायदा झाला."

# प्रस्तावना.....

कोव्हीड 19 या महामारीचा परिणाम संपूर्ण जगभरात झाला तसाच तो भारतावर आ णे प्राम महाराष्ट्रावर देखील झाला. मार्च 2019 ला या महामारीची सुरुवात झाल्यानंतर उच्च व तंत्र क्षण महाराष्ट्र शासन राष्ट्रीय सेवा योजनेने अतिशय महत्वाची पाउले उचलली. महाराष्ट्र तील विद्यापीठातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी या महामारीत आपले भरीव योगदान समाजाप्रती असणारी संवेदनशीलता आणि NOT ME BUT YOU हे ब्रीद उराशी बाळगून स्वयंसेवकांनी रक्तदान आणि प्लाझ्मा दान, मास्क आणि सॅनिटायझरची निर्मिती आणि वाटप, अन्नदान आणि आवश्यक साहित्य वाटप, वृद्ध आणि गरजू लोकांसाठी आवश्यक मदत, लसीक मोहिमेसाठी जनजागृती अशी अनेकविध कामे करून या योजनेची समाजभिमुखता अतिशय केली.

प्रिया पाटील या स्वयंसेविकेने कोव्हीडच्या काळात मृत्यू झालेल्या व्यक्तींचे केलेले अंत्यविधी, काटेनी केलेली वैद्यकीय मदत, सना कुंवारीने कम्युनिटी किचनची केलेली उभारणी, शिवन आदिवासी भागातील विद्यार्थ्यांसाठी राबविलेली शिक्षणाची चळवळ, आशा आणि अंगणवाडी सेविके सहभागी होऊन काम करणारी त्रिवेणी लांजे, थुंकी मुक्त गाव, थुंकी मुक्त देश हि चळवळ पंचक्रो राबविणारा वेदांत डिके याबरोबरच महाराष्ट्रातील विविध विद्यापीठाचे स्वयंसेकांनी घरी राहून आणि शासन यंत्रणेच्या बरोबरीने कामे केली. स्वयंसेवकांनी केलेली ही कामे सामाजिक आणि शास दृष्टीने अतिशय महत्त्वाची असुन हे स्वयंसेवक सुध्दा योध्दे आहेत. अशी आमची भूमिका आहे.

मागील 5 ते 7 वर्षापासून राष्ट्रीय सेवा योजना, महाराष्ट्र हे युनिसेफ या आंतरराष्ट्रीय संस्थे एकत्रित काम करत आहे. सयुंक्त विद्यमाने युवकांमध्ये नेतृत्त्व गुण विकसित करणे तसेच युवक विकासाच्या प्रक्रियेत सहभाग घेण्यासाठी मोठ्या प्रमाणावर विविध उपक्रम राबवण्यात येत आहेत.

सन 2020 पासून सुरु झालेल्या कोविड-19 सारख्या जागतिक महामारीमध्ये राष्ट्रीय योजनेने युनिसेफच्या सहकार्याने रासेयो विद्यापीठस्तरीय संचालक/समन्वयक, जिल्हा समन्व विभाग समन्वयक, कार्यक्रम अधिकारी व स्वयंसेवकांना ऑनलाइन प्रशिक्षण कार्यक्रम आयो करण्यात आले होते. याची फलनिश्चिती म्हणून रासेयोच्या स्वयंसेवकांनी कार्यक्रम अधिकाऱ्यांच्या मद या जागतिक महामारीमध्ये भरीव योगदान दिले. यामध्ये काही विद्यापीठांनी अन्नछत्र, पोलीस सहकार्य, मास्क व सॅनिटायझर निर्मिती व वाटप, सर्वेक्षण, रुग्ण सर्वेक्षण, कोविड सेंटर मध्ये रुग्ण आनंदी ठेवण्यासाठी योगा तसेच मनोरंजन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.